# प्रेसनोट

नाशिक,
दि. २५/०८/२०२२

**आलोसे दिनेशकुमार बुधा बागुल, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास विभाग, विभागीय कार्यालय नाशिक, जि.नाशिक यांना २८,८०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | दिनेशकुमार बुधा बागुल, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास विभाग, विभागीय कार्यालय नाशिक, जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २८,८०,०००/—रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **२८,८०,०००/—रूपये** |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे काम करीत असलेल्या आर.के.इन्फ्रा. कॉन्स्ट्रो प्रा.लिमिटेड या फर्मचे नाशिक जिल्हयातील हरसुल येथील आदिवासी मुला—मुलींचे वस्तीगृहातील सेंट्रल किचनचे काम सुरु करण्यासाठी लागणारा कार्यारंभ आदेश देण्याचे मोबदल्यात आलोसे दिनेशकुमार बुधा बागुल, कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास विभाग, विभागीय कार्यालय नाशिक, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामाच्या एकुण दोन कोटी चाळीस लाख रुपये रक्कमेच्या १२ % प्रमाणे **२८,८०,०००/—रूपये** लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दि. १९/०८/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि.नाशिक पथकाने दिनांक १९/०८/२०२२ रोजी पडताळणी करुन आज दिनांक २५/०८/२०२२ रोजी सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडे आलोसे दिनेशकुमार बुधा बागुल, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास विभाग, विभागीय कार्यालय नाशिक, जि.नाशिक यांनी **२८,८०,०००/—रूपये** लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम पंच व साक्षीदार यांचेसमक्ष प्लॅट नं.९०२, नयनतारा अपार्टमेंट, तिडके कॉलनी नाशिक येथे त्यांचे स्वत:चे राहते घरात **स्विकारल्याने** त्यांना पकडण्यात आले असून त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची पुढील कार्यवाही चालु आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :— | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :— | acbmaharashtra.gov.in |
| ई—मेल | :— | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :— | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :— | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :— | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र | :— | ९९३०९९७७०० |

( सतिश भामरे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक.